क्रमांक : ज्येसू-१५२४/ वाचा-लिटं-संब-अं-२४ /२०/प्रशा-२/ ११६२
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकीय इमारत, आठवा मजला,
मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दिनांक : २४/०८/२०२४

**परिपत्रक**

**विषय :- गट-क मधील लिपिक टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्तीसाठी अर्हता प्राप्त करणाऱ्या वाहन चालक संवर्गामधील कर्मचाऱ्यांची दिनांक १/१/२०२४ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसारीत करणेबाबत.**

शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आरटीआर २०१४/प्र.क्र.३५५/१२, दिनांक ६/६/२०१७ व क्रमांक आरटीआर १०१३-/प्र.क्र.५०/१३/१४-अ, दिनांक २१/२/२०१८ अधिसूचित करण्यात आलेली असून वाहनचालक संवर्गातून लिपिक टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्ती करीता शैक्षणिक अर्हता पदवी करण्यात आलेली आहे.

२/- तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ०५/१२/२०१८ अन्वये मंत्रालयीन विभागातील वाहनचालक पदावरुन लिपिक टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्ती देताना अनुसरावयाची कार्यपध्दती विषद केली आहे. मंत्रालयीन विभागाच्या धर्तीवर संचालनालयातील वाहनचालक संवर्गामधील जे कर्मचारी लिपिक टंकलेखक पदावरील बदलीने नियुक्तीसाठी इच्छूकता देऊन अर्हता धारण करीत असतील त्यांची दिनांक २१/२/२०१८ नंतरच्या प्रत्येक वर्षी दिनांक १ जानेवारी रोजीची ज्येष्ठता सूची तयार करुन त्या आधारे लिपिक टंकलेखक पदावर ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर कायमस्वरुपी संवर्ग बदलीने नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्याबाबत नमूद केले आहे. तसेच सदर ज्येष्ठतासूचीमध्ये पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व वाहनचालक संवर्गामध्ये तीन वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या व टंकलेखनातील आवश्यक गती (मराठी ३० श.प्र.मि.) किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि. असल्याचे नियमानुसार विहित केलेले प्रमाणपत्र (शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र (गव्हर्नमेंट कमर्शिअल सर्टिफिकेट)) किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश असेल, असे नमूद केले आहे.

३/- यास्तव संचालनालयातील वाहन चालक संवर्गातील कर्मचाऱ्यांपैकी, गट-क मधील लिपिक टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्तीसाठी अर्हता प्राप्त व अर्ज केलेल्या कर्मचाऱ्यांची दिनांक १/१/२०२४ रोजीची तात्पुरती (provisional) ज्येष्ठतासूची संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक ज्येसू-१५२४/वाचा-लिटं-संब-अं२४/२०/प्रशा-२/४५३, दिनांक २८/३/२०२४ अन्वये प्रसारीत केली आहे. सदरच्या तात्पुरत्या ज्येष्ठता सूची संदर्भात आक्षेप/त्रुटी असल्यास तीन आठवडयाच्या आत कळविण्याबाबत कर्मचाऱ्यांना सदरच्या परिपत्रकान्वये सुचित केले होते.

४- तात्पुरत्या ज्येठता सुची संदर्भात प्राप्त आक्षेप विचारात घेऊन गट-क मधील लिपिक टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्तीसाठी अर्हता प्राप्त व अर्ज केलेल्या कर्मचाऱ्यांची दिनांक १/१/२०२४ रोजीची अंतिम ज्येष्ठता सूची यासोबत संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसारित केली आहे. अंतिम प्रसारीत ज्येष्ठता सूचीतील स्तंभ ११ मध्ये दर्शविलेले दिनांक केवळ ज्येष्ठतेच्या प्रयोजनार्थ आहेत. जातीच्या नोंदी जात प्रमाणपत्र वैध असल्याचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून प्राप्त होईल, या अटीस अधीन राहून नोंदविल्या आहेत.

...२/-

५/- सर्व संबंधित कर्मचाऱ्यांनी प्रस्तुत परिपत्रक मिळाल्याची पोच उलट टपाली संचालनालयास त्यांच्या कार्यालय प्रमूखामार्फत पाठविण्यात यावी.

६-/ सदर परिपत्रक सोबतच्या ज्येष्ठतासूचीसह संचालनालयाच्या http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे .

(नि.म.प्रभुदेसाई)
उप संचालक (प्रशासन),
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

प्रति,
श्री. ------------------------------------------------
वाहन चालक
------------------------------------------------
------------------------------------------------

प्रत :

१. सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय (सर्व) - सदरचे परिपत्रक वाहनचालक संवर्गातील कर्मचाऱ्यांना देण्यात यावे व त्याबाबतची पोच त्यांच्याकडून घेऊन संचालनालयास पाठविण्यात यावी.
२. जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय (सर्व) - सदरचे परिपत्रक वाहनचालक संवर्गातील कर्मचाऱ्यांना देण्यात यावे व त्याबाबतची पोच त्यांच्याकडून घेऊन संचालनालयास पाठविण्यात यावी.
३. कक्ष अधिकारी (का-१४२६), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रपत्र ब**

**अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील वाहनचालक संवर्गातून लिपिक टंकलेखक पदावर संवर्गबाह्य बदलीने नियुक्तीसाठी दिनांक १.१.२०२४ रोजी पात्र असलेल्या कर्मचा-यांची ज्येष्ठतेनुसार अंतिम यादी**

| अ.क्र. | वाहनचालक संवर्गामधील कर्मचा-याचे नाव | कर्मचाऱ्याचा जात प्रवर्ग | जन्म दिनांक | वाहनचालक संवर्गातील ज्येष्ठताक्रम | वाहनचालक संवर्गामधील नियुक्तीचा दिनांक | वाहनचालक संवर्गामधील ज्येष्ठतेचा दिनांक | पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मराठी ३० श.प्र.मि./ इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र / संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | एमएससीआयटी संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याचा दिनांक | लिपिक टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्तीसाठी ज्येष्ठता दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | श्री.रा.ल.गावित | अज | १७/०३/१९७८ | ९ | ०८/१२/२०१४ | ०८/१२/२०१४ | ०९/०८/२०२२ | १५/०३/२०१९ | १२/१२/२०२३ | ०९/०८/२०२२ | ३१/०३/२०३६ | |
| २ | श्री.प्र.ना.प्रेमलवार | विमाप्र | २९/०४/१९७९ | १२ | ०९/१२/२०१४ | ०९/१२/२०१४ | ३०/०६/२०१३ | २४/०३/२०१७ | १४/०८/२०२४ | ०८/१२/२०१७ | ३०/०४/२०३७ | |

(नि.म.प्रभुदेसाई)
उप संचालक (प्रशासन),
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.